सी.बी.टी. प्रकाशन

# चार बहिऱ्यांचा गोंधळ



बा. वा.

# चार बहिऱ्यांचा गोंधळ

लेखक : शंकर
चित्रांकन : मृणाल मित्र
अनुवाद : अलका साने



CHAAR BAHIRYANCHA
GONDHAL (Marathi)

© by CBT 1991


ISBN 81-7011-513-2

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नवी दिल्ली

क्र. २५८९

# चार बहिऱ्यांचा गोंधळ

लेखक : शंकर
चित्रांकन : मृणाल मित्र
अनुवाद : अलका साने







मदुराई गावात एक ठार बहिरा धनगर रहात असे. बहिरा असला तरी तो आपले काम उत्तम तऱ्हेने करीत असे. त्याच्याकडे बकऱ्यांचा मोठा कळप होता. रोज पहाटे तो बकऱ्यांच्या कळपाला एका टेकडीच्या जवळपास झाडपाला व गवत चरावयास नेत असे. स्वतः एका झाडाखाली बसून, बासरी वाजवत , प्रत्येक बकरीवर बारकाईने लक्ष ठेवित असे.

दपारी त्याची बायको जेवण आणित असे, व ती दोघे एकत्र जेवत असत.



एके दिवशी त्याची बायको आलीच नाही. त्याने तिची बराच वेळ वाट पाहिली. आता त्याला भूक लागली, आणि त्याचबरोबर बायकोची काळजी पण वाटू लागली. ''तिला काय बरं झालं असावं ?'' ''घरी जाऊन तिची हालहवाल बघावी कां ?'' असा त्याने मनात विचार केला.

''पण मग बकऱ्या कोण सांभाळणार ?''

टेकडीच्या पायथ्याशी एक गाव होते. गावात बरीच घरे होती. एका घराच्या ओसरीवर एक रखवालदार बसत असे.








त्याचे हावभाव-हातवारे बघून, तो आपल्या बकऱ्या सांभाळण्यास तयार झाला आहे असे धनगरास वाटले व त्याला दुवा देत तो धावतच घरी गेला.

घरी पोहोचला तेव्हा त्याची बायको बिछान्यावर पडून होती. तापाने ती चांगलीच फणफणली होती. तिला बोलवत सुध्दा नव्हते.

धनगराने थोडे पाणी उकळविले. त्यात औषधी मुळ्या घातल्या व काढा तयार करून तिला पाजला. त्याने थोडी खिचडी शिजवली व दोघांनी जेवण केले.

एवढं सगळं करून, तो धावतच टेकडीच्या पायथ्याशी आला व आधी त्याने बकऱ्या मोजल्या. सर्व बकऱ्या सुरक्षित होत्या.



धनगर रखवालदारा कडे गेला व म्हणाला, ''माझी बायको आज जेवण घेऊन आली नाही. असं कधीच होत नाही. तिला काय अडचण आली कुणास ठाऊक. तेव्हा मला घरी गेलंच पाहिजे. मी येईपर्यंत तू माझ्या बकऱ्या सांभाळशील का ?''

तो रखवालदार सुध्दा ठार बहिरा होता. त्याने उत्तर दिले, ''तू काही काळजी करू नकोस.''

''मी इथे पहारा देत आहे तोपर्यंत कोणीही घुसणार नाही या गावात.''









त्याचे हावभाव-हातवारे बघून, तो आपल्या बकऱ्या सांभाळण्यास तयार झाला आहे असे धनगरास वाटले व त्याला दुवा देत तो धावतच घरी गेला.

घरी पोहोचला तेव्हा त्याची बायको बिछान्यावर पडून होती. तापाने ती चांगलीच फणफणली होती. तिला बोलवत सुध्दा नव्हते.

धनगराने थोडे पाणी उकळविले. त्यात औषधी मुळ्या घातल्या व काढा तयार करून तिला पाजला. त्याने थोडी खिचडी शिजवली व दोघांनी जेवण केले.
एवढं सगळं करून, तो धावतच टेकडीच्या पायथ्याशी आला व आधी त्याने बकऱ्या मोजल्या. सर्व बकऱ्या सुरक्षित होत्या.

रखवालदाराचे कसे आभार मानावे हे त्याला कळेना. एक लहानशी भेट त्याला द्यावी, असे त्याने ठरवले. त्याने एक लंगडी बकरी उचलली व रखवालदारापाशी जाऊन त्याला देऊ लागला. परंतु रखवालदाराने त्याचा वेगळाच अर्थ लावला.आपणच बकरीला दुखापत केली, असा आरोप धनगर आपल्यावर करीत आहे, असे त्याला वाटले.

''मी तुझ्या बकऱ्यांच्या जवळपाससुध्दा फिरकलेलो नाही, मग तुझ्या बकरीला मी कसा इजा करणार ?'' तो ओरडला.





''तू फार दयाळू तसंच मदत करणारा आहेस. तुझ्यामुळेच मला घरी जाता आलं आणि बायकोची विचारपूस करता आली. मी एक गरीब धनगर ! जास्त काय देणार ! तू केलेल्या  उपकाराची परतफेड म्हणून ही बकरी तुला देतो आहे.'' धनगर मोठयाने म्हणाला.

आता मात्र रखवालदाराचा संताप अनावर झाला. तो रागाने ओरडला, ''मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे की तुझ्या  एकाही बकरीला मी काहीही केलेलं नाही. कृपया तू आता मला त्रास देऊ नकोस.''

''मोठया आदराने आणि प्रेमाने मी हे अल्पसं बक्षीस तुला देत आहे.'' मोठया विनयाने धनगर बोलला.

''किती वेळा तुला सांगू की, तुझ्या बकऱ्यांना मी दुखापत केलेली नाही. तू माझा अपमान करीत आहेस.''

दोघांची अशी जोरजोरात वादावादी चालू असताना, एक घोडेस्वार तेथे आला.

धनगर व रखवालदाराने त्याला थांबविले व आपले भांडण सोडविण्याची विनंती केली.

तो घोडेस्वारसुध्दा त्यांच्यासारखा बहिरा होता. त्याला लौकरात लौकर घरी पोहचायचे होते. त्या करता त्याने घोडा चोरला होता.









बाल वाङ्मय
२७८८
बा. वा.

त्याला वाटले की, आपण चोरी केली हे या दोघांच्या लक्षात आलेले आहे. ''कृपा करा.'' तो बोलला. ''पाहिजे तर हा घोडा घ्या, पण नसती कटकट माझ्या मागे लावू नका, मी चालत चालत जाईन घरी.''

''हा अन्याय आहे ! नक्कीच अन्याय आहे !'' शब्दांवर जोर देत रखवालदार बोलला ,''मी याच्या बकऱ्यांना मारलं, असा हा खोटा आरोप माझ्यावर करतो आहे.''

''त्याच्या उपकाराची परतफेड म्हणून ही भेट मी त्याला देत आहे.'' धनगर विनयाने म्हणाला.

तेवढयात एक चौथा मनुष्य तेथे आला. तो फारच म्हातारा होता. एक लांब काठी त्याच्या हातात होती. धावतपळत तो तिघांपाशी गेला व ओरडू लागला. ''मी परत जाणार नाही ! मुळीच परत जाणार नाही ! तुमच्या पैकी कोणीही मला जबरदस्ती करून, परत पाठवू शकणार नाही.'' या म्हाताऱ्या माणसा कडून आपले भांडण सोडवून घ्यावे, असा विचार तिघांच्या मनात आला.





परंतु तो म्हातारा-सुध्दा अगदी ठार बहिरा होता.

"तुम्ही मला बायकोकडे परत पाठविता? अहो, माझी बायको मूर्ख बाई आहे. तिने मला घराबाहेर हाकलून दिलं. मी तुम्हाला सांगतो मी परत जाणार नाही."







त्या चार माणसांनी तेथे इतका गोंधळ घातला की त्यांच्या भोवती लोक गोळा झाले. सर्वत्र कोलाहल माजला. हा गोंधळ कशाकरता आहे हे कोणालाही समजेना.


गर्दी आणखीनच वाढली. आपल्याला येथून सटकण्यास, योग्य वेळ हीच आहे, असे घोडेस्वाराला वाटले. आपला घोडा त्याने वळविला व भरधाव सोडला.





''तिने माझा अपमान केला आहे, मी तिचं तोंड सुध्दा बघणार नाही.'' असे किंचाळत तो म्हातारा माणूस काठी टेकीत तेथून निघाला.





तेथील जमावाला हे सर्व काय चालले आहे, याचा थांगपत्ताच लागेना. येथे थांबण्यात अर्थ नाही असे वाटून, गर्दी हळूहळू पांगली.

पण अजून धनगराचा व रखवालदाराचा वाद कुठे संपला होता ? गर्दीला सर्व गोंधळात त्यांचा वाद कळलाच नव्हता. ते दोघे आपले शिरा ताणून ताणून आपलाच मुद्दा सांगत होते. आणि असे किती वेळ चालले कोण जाणे !

BVBK-0402787

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह ज़फर मार्ग, नवी दिल्ली द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या
इंद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित.